71

**आदेश**

उपविभागीय अधिकारी बुलडाणा
876
भूसमस
दिनांक 12 FEB 2021

क्र.कावि/कक्ष7:2/प्रअभूसं/कावि/ 306 /2021
जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
दिनांक- 12 / 02 / 2021

**विषय :-** भुमी संपादन,व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 25 नुसार भू.सं.प्र.क्र.15/2010-11 मौजे वरवंड ता.जि.बुलडाणा प्रकरणात प्रारुप निवाडा करीता मुदतवाढ मिळणे बाबत.

**संदर्भ:-** उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,बुलडाणा यांचे पत्र क्र.कावि/उविअ/भुसं/ जा.क्र./ 233/2021 दिनांक 03/02/2021.(प्राप्त दिनांक 05-02-2021)

*****

ज्या अर्थी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,बुलडाणा यांनी त्यांच्या संदर्भीय पत्रानुसार भूमी संपादन,व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 25 नुसार भू.सं.प्र.क्र.15/2010-11 मौजे वरवंड ता.जि.बुलडाणा प्रकरणात प्रारुप निवाडा करीता मुदतवाढ मिळणे बाबतचा प्रस्ताव या कार्यालयात सादर करण्यात आला आहे.

सदर प्रकरणात उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,बुलडाणा यांनी सदर प्रकरणाची कलम 19 ची अधिसुचना ची अंतीम प्रसिध्दी तलाठी कार्यालयात दिनांक 20-02-2020 रोजी करण्यात आली असून प्रकरण निवाडयाकरीता असून कलम 19 पासून 12 महिन्याचे आंत म्हणजे दिनांक 19-02-2021 पर्यंत निवाडयाची कार्यवाही होणे आवश्यक आहे. परंतु सरदहू प्रकरणात संपादीत जमीनीतील मालमत्तेचा तसेच फळझाडांचा मुल्यांकन अहवाल अप्राप्त असून उपरोक्त कार्यवाहीसाठी काही कालावधी लागणार असल्यामुळें प्रकरणातील निवाडयाच्या कार्यवाहीसाठी 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 25 मध्ये जिल्हाधिकारी,कलम 19 अन्वये घोषणा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून बारा महिन्याच्या कालावधीत निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर जमीन संपादनाची संपूर्ण कार्यवाही रद्द होईल.

परंतु,त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, समुचित शासनाला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल.

परंतु आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय,लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या वेबसाईटवर टाकण्यात येईल.अशी तरतूद आहे.

तरी भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम 2013 चे नियम 25 मधील तरतुदीनुसार भुसंपादन प्रकरण क्रमांक 15/2010-11 मौजे वरवंड ता.जि.बुलडाणा या प्रकरणात निवाडा करण्यास 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यांत येत आहे.

(एस.रामामूर्ती-भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी बुलडाणा

76
12/02/21